# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
### १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/पीएच.डी.२ वे.वाढी/२०२० /१२७ दि.१४/०१/२०२०

**महत्वाचे/तात्काळ**

प्रति,

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२) प्राचार्य/प्राचार्या,

सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक जिल्हे.

विषय:- मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१.०१.१९९६ पूर्वीच्या पीएच.डी. अर्हता धारण केली असणाऱ्या अध्यापकीय कर्मचाऱ्यांना पीएच.डी. च्या दोन आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय करणेबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.४१९/१७/ विशि-१, दि.१३/०९/२०१९.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, दि.११/१२/१९९९ च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन दि.१३/०६/२००० च्या शासन निर्णयान्वये विविध मुद्यांबाबत स्पष्टीकरण करण्यात आले. त्यानंतर शासन पत्र दि.२०/०९/२००१ अन्वये दि.०१/०१/१९९६ पूर्वी पीएच.डी. धारण केलेल्या अधिव्याख्यात्यांना दोन आगाऊ वेतनवाढी दि.२७/०७/१९९८ पासून देण्यात याव्यात असा खुलासा करण्यात आला.

दि.०१/०१/१९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण करणाऱ्या अधिव्याख्यात्यांना पीएच.डी. च्या वेतनवाढी आगाऊ दोन वेतनवाढी दि.०१/०१/१९९६ पासून मिळणेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.१०८४/२००३, १०४३१/२०१२, ५४४/२००८, ९६६/२०१६, १२१२२/२०१६, ६०४३/२०१६ अशी विविध याचिका दाखल झाल्यास. सदरहू याचिकांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ज्या अधिव्याख्यात्यांना दि.०१/०१/१९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण केली आहे अशा अधिव्याख्यात्यांना पीएच.डी. च्या आगाऊ

दोन वेतनवाढी दि.२७/०७/१९९८ अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. त्याऐवजी या दोन आगाऊ वेतनवाढी दि.०१/०१/१९९६ पासून अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत.

उक्त बाब विचारात घेता, आपल्या महाविद्यालयातील पात्र ठरणाऱ्या अधिव्याख्यात्यांना दोन आगाऊ वेतनवाढी दि.२७/०७/१९९८ ऐवजी दि.०१/०१/१९९६ रोजी अनुज्ञेय करण्यासाठी प्रस्तावाचा महाविद्यालयस्तरावरुन प्राचार्यांनी स्वत: छाननी करुन वेतननिश्चितीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मूळ सेवापुस्तक व इतर अनुषंगिक कागदपत्रांसह या कार्यालयास **तात्काळ** सादर करण्यात यावेत.

जेणेकरुन उक्त प्रकरणी शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने कार्यवाही करणे या कार्यालयास सोईचे होईल.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे १

प्रत:- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.